फलोत्पादन

द्राक्ष सल्ला

# पावसाळ्याच्या सुरुवातीला भेडसावणाऱ्या किडींची समस्या

डॉ. दीपेंद्र सिंह यादव, सागर म्हस्के

**पावसाळा सुरू होताना तापमानामध्ये घट होते. पूर्वमोसमी पावसामुळे या काळात आर्द्रता वाढते. या काळामध्ये काही किडींचा प्रादुर्भाव वाढतो. या किडीच्या नियंत्रणाकडे वेळीच लक्ष द्यावे.**

## खोडकीड (स्ट्रोमॅशिअम बारबॅटम)


**खोडकीडीची अळी व प्रौढ**

स्ट्रोमॅशिअम बारबॅटम या खोडकिडीचे प्रौढ भुंगेरे साधारणतः मॉन्सूनपूर्व, जून महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात खोडातून तसेच ओलांड्यातून बाहेर येतात. बाहेर आल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून मादी भुंगेरे मुख्यतः सैल सालीच्या आत, खोडावर तसेच ओलांड्यावर एकेक किंवा पुंजक्याने अंडी द्यायला सुरुवात करते. अंड्यातून बाहेर आलेली अळी खोड पोखरत आत जाते. बोगदा तयार करते. भुस्सा किंवा भुकटी बाहेर न टाकता बोगद्यातच ठासून भरत असल्याने शेतकऱ्यांना या किडीचा प्रादुर्भाव सहजासहजी कळून येत नाही. पोखरलेले खोड ठिसूळ होऊन लवकर मोडते. साधारणपणे २ ते ३ वर्षांत या किडीच्या प्रादुर्भावामुळे द्राक्षपिकाच्या उत्पादनात ५० टक्क्यांपेक्षा अधिक घट होते.

### उपाययोजना

या खोडकिडीच्या नियंत्रणासाठी जून महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात (वर्षातून फक्त १५ दिवस) लक्ष देऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

- एप्रिल छाटणीनंतर मॉन्सूनपूर्व कालावधीत द्राक्षवेलीवरची संपूर्ण ढिली किंवा सुटलेली साल हाताने काढून घ्यावी. साल काढल्यामुळे दोन फायदे होतात. १) खोडकिडीला सालीखाली लपण्यासाठी जागा मिळत नाही. २) फवारणीवेळी खोड आणि ओलांडे चांगले धुतले जातील.
- कडुलिंबाचे तेल किंवा कडुलिंबाच्या बियांचा अर्क किंवा अॅझाडिरॅक्टिन (३०० पीपीएम) ३ ते ५ मि.लि. प्रति लिटर या प्रमाणात प्रतिबंधात्मक फवारणी करावी. किंवा द्राक्षांच्या बागेत कडुलिंबाची पाने फक्त लटकवून ठेवली तरी खोडकिडीचे प्रौढांना बागेपासून दूर ठेवण्याचे काम करतात.
- जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून बागेजवळ १ प्रकाश सापळा प्रति एकर लावावा. या सापळ्याकडे खोड किडीचे भुंगेरे आकर्षित होतात. सापळ्यात हे भुंगेरे सापडू लागल्यानंतर पुढील कीटकनाशकांच्या फवारणीचे नियोजन करावे. फवारणी प्रति लिटर पाणी
- लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (४.९ सीएस) ०.५ मि.लि. किंवा फिप्रोनील (८० डब्ल्यूपी) ०.०६२५ ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड (१७.८ एसएल) ०.३ मि.लि. किंवा मिथोमिल (४० एसपी) १ मि.लि. ३ ते ४ दिवसांच्या अंतराने कीटकनाशक बदलून ५ ते ६ वेळा खोड आणि ओलांडे चांगले धुवून घ्यावे.

## चाफर भुंगेरे (हुमणीचे प्रौढ)


**चाफर भुंगेरे द्राक्ष वेलीची पाने खातात.**

हुमणी अळीची प्रौढावस्था म्हणजे चाफर भुंगेरे होते. हे भुंगेरे मे - जून महिन्यांत चांगला पाऊस पडल्यावर जमिनीतून बाहेर येतात. रात्रीच्या कालावधीत हे भुंगेरे जास्त सक्रिय असतात आणि दिवसाच्या कालावधीत लपून बसलेले असतात. नर आणि मादीच्या मिलनानंतर मादी साधारण ५० अंडी जमिनीमध्ये पिकाच्या मुळ्याजवळ घालते. अंड्यातून बाहेर आलेल्या अळ्या पिकाच्या मुळ्यावर आपली उपजीविका करतात. अर्थात, द्राक्षपिकात मुळ्या खाऊन नुकसान ही अद्याप मोठी समस्या नाही. मात्र या किडीचे प्रौढ भुंगेरे द्राक्षाची पाने खातात. विशेषतः बागेतील बाजूच्या झाडांवर यांचा जास्त प्रादुर्भाव व नुकसान दिसून येते.

### उपाययोजना

लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (४.९ सीएस) ०.५ मि.लि. प्रति लिटर पाणी या प्रमाणे रात्रीच्या वेळी फवारणी करावी.

## नवीन लाल अळी

### (डर्व्हिशिया कडंबी)



या किडीचा मादी पतंग अंडी जुलै - ऑगस्ट महिन्यांत मुख्यतः सैल सालीच्या आत, खोडावर तसेच ओलांड्यावर पुंजक्याच्या स्वरूपात घालतो. या अळीच्या सुरवातीच्या अवस्था खोडावर आणि शेवटच्या अवस्था खोडाला छिद्र पाडून आतमध्ये शिरतात. परिणामी झाड एका वर्षातच अनुत्पादक होते.

### उपाययोजना

- डर्व्हिशिया कडंबी अळीच्या नियंत्रणासाठी ढिली झालेली साल काढून घेणे गरजेचे आहे.


**डर्व्हिशिया कडंबीचा प्रौढ**

- एकरी एक प्रकाश सापळा लावावा. प्रकाश सापळ्याकडे या किडीचे पतंग जास्त आकर्षित होतात.
- मेटारायझियम बुरशीची प्रतिबंधात्मक उपाय म्हणून महिन्यातून १ ते २ वेळा फवारणी करावी, त्यामुळे काही प्रमाणात कीडनियंत्रित होते.
- रासायनिक पद्धतीने नियंत्रण करायचे झाल्यास, साल काढल्यानंतर लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (४.९ सीएस) २.५ मि.लि. प्रति लिटर या द्रावणाने फक्त खोड आणि ओलांडे चांगले धुऊन घ्यावेत.

## पिठ्या ढेकूण (मिलीबग)

या किडीचा प्रादुर्भाव उन्हाळ्यात एप्रिल- मे महिन्यांत जास्त तापमानामुळे कमी असतो. बागेत शिल्लक असलेला मिलीबग सालीच्या आत लपून बसलेला असतो. तापमान कमी होऊन ढगाळ वातावरण तयार होऊ लागताच मिलीबगचा प्रादुर्भाव वाढत जातो.

- पावसाळ्याच्या कालावधीत मिलीबग नियंत्रणासाठी कोणतेही रासायनिक कीटकनाशक फवारण्याची गरज नाही. कारण या कालावधीत आर्द्रता जास्त असल्याने मिलीबगला खाणाऱ्या नैसर्गिक शत्रू कीटकांची संख्या वाढते. ते मिलीबगला नियंत्रित करतात.
- जैविक नियंत्रणासाठी मेटारायझियम किंवा लेकॅनी सिलियम बुरशींचा प्रतिबंधात्मक म्हणून वापर करता येतो. (फवारणी प्रमाण ५ मि.लि. प्रति लिटर प्रत्येकी) त्यानेही आपल्याला चांगले नियंत्रण मिळेल.

## पाने खाणारी अळी (स्पोडोप्टेरा स्पे.)

आर्द्रता वाढल्यावर स्पोडोप्टेरा अळीचा प्रादुर्भाव दिसून येईल. प्रकाश सापळ्याकडे या किडीचे पतंग जास्तीत जास्त आकर्षित होतात. पावसाळ्यात आपण या किडीला नियंत्रित केले तर फळ छाटणीनंतर हिचा प्रादुर्भाव जास्त दिसणार नाही.

- नैसर्गिक नियंत्रणासाठी एकरी ५ स्पोडोल्यूर सापळे बागेत लावावेत. जैविक नियंत्रणासाठी एनपीव्ही विषाणूजन्य कीटकनाशकांचा वापर करता येतो. (फवारणी प्रमाण : २५० एलई प्रति एकरी)
- स्पोडोप्टेरा अळीचा जर जास्त प्रादुर्भाव दिसून येत असेल, रासायनिक नियंत्रण पद्धतीचा वापर करावा. फवारणी प्रति लिटर पाणी इमामेक्टिन बेन्झोएट ०.२२ ग्रॅम किंवा फिप्रोनिल ०.०६२५ ग्रॅम किंवा सायअॅण्ट्रानिलीप्रोल ०.७ मि.लि.

**डॉ. दीपेंद्र सिंह यादव, ९२७२१२२८५८**
**(राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे.)**